# भारतीय राजकारणाचे गुन्हेगारीकरण

**प्रा. काळे एस. ए.**

*के. व्ही. एन. नाईक शिक्षण प्रसारक संस्थेचे,*

*कला व वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, नाशिक*

## प्रास्ताविक –

भारतात सत्तालक्षी राजकारणाने धर्म, जात व अर्थकारणाचा आधार घेतलेला दिसतो. भारतातील राजकारण एवढयावरच न थांबता आपले वर्चस्व राखण्यासाठी हिंसेचा अवलंब होताना पहावयास मिळतो. राजकीय प्रक्रिया चालविण्यासाठी राजकारण आवश्यक असले तरी यासाठी हिंसेचा साधन म्हणून वापर होणे लोकशाहीसाठी खेदजनक बाब आहे. म्हणूनच राजकारण हे सर्वसामान्य माणसाचे क्षेत्र नाही, शहाण्या माणसाने राजकारणात पडू नये असे अनेकदा बोलले जाते. मात्र देशाची राजधानी दिल्ली ते देशाच्या प्रत्येक गल्लीत सामाजिक, राजकीय, आर्थिक, शैक्षणिक, सांस्कृतीक राजकारण दिसते. या सर्व राजकारणात हिंसेचा सर्रास वापर होतो.

स्वातंत्र्यानंतर भारतीय राज्यघटनेने संसदीय लोकशाही स्वीकारली. मात्र देशात खऱ्या अर्थाने लोकशाही यावयाची असेल तर खुल्या व स्वच्छ वातावरणात निवडणुका होऊन योग्य व पात्र प्रतिनिधींची निवड होणे आवश्यक असते. शांततामय मार्गाने सत्तांतर घडवून आणण्याचा मार्ग म्हणून लोकशाहीतील निवडणुकांकडे पहिले जाते मात्र निवडणुकीतील काही घटनावरून योग्य उमेदवार मतदाराकडून कसा निवडला जातो? मतदात्यावर काही दडपण असते का? याचा फारसा विचार कोणी करत नाही. या निवडणुकांचे वर्णन मात्र मुक्त व निर्भय वातावरणात पार पडलेल्या निवडणुका असे केले जाते. प्रत्यक्षात मतदारांना धाक दाखविणे, मतपेट्या पळविणे मतदान केंद्रावर हल्ला करणे, बोगस मतदान करणे असे प्रकार सर्रास दिसून येतात. निवडणूक प्रक्रियेतील वाढता हिंसाचार हा गुन्हेगारांना उजळमाथ्याने वावरण्याची संधी देत आहे.

1970 च्या दशकापूर्वी लोकसभा, विधानसभा किंवा स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका लढविणारे उमेदवार किंवा राजकीय पक्ष प्रत्यक्ष–अप्रत्यक्ष गुंड, गुन्हेगार मवाल्यांच्या प्रभावाचा वापर निवडणुकीत निवडून येण्यासाठी काही अंशी वापर करत. हे गुंड मवाली जनतेस दमदाटी करून अर्थकारणाच्या माध्यमातून हवे ते मतदान करवून घेत. नंतरच्या काळात मात्र या गुन्हेगार प्रवृत्तीच्या लोकांनी राजकीय पक्षाच्या उमेदवारांना मदत करण्याऐवजी स्वतःच अपक्ष म्हणून निवडणूक लढविण्यास सुरुवात केली. यातून काही जण निवडून आल्यावर पुढील निवडणुकीत राजकीय पक्षांनीच त्यांना पक्षीय उमेदवारी देण्यास सुरुवात केली. यातूनच मोठ्या प्रमाणात राजकारणाचे गुन्हेगारीकारण झालेले आहे.

सर्वच राजकीय पक्षामध्ये गुन्हेगारी प्रवृत्ती असणारे लोक दिसून येतात. १९५१ च्या लोकप्रतिनिधीत्वाच्या कायद्यातील तरतुदीचा गैरफायदा घेऊन हे लोक निवडणुका लढवितात. भारतीय राजकारणातील कोंग्रेस, भाजप समाजवादी व इतर पक्षही निवडून येण्याची क्षमता या एकाच निकषावर गुन्हेगारी पार्श्वभूमीच्या लोकांना उमेदवारी देतात. भारतीय न्याय प्रक्रियेत खटले वर्षानुवर्षे प्रलंबित राहतात हे माहीत असल्यामुळे नेमक्या याच स्थितीचा फायदा घेऊन निवडून आलेले गुन्हेगार नेते राजकारणात आपले वर्चस्व टिकून ठेवतात. बिहार, उत्तरप्रदेश सारख्या राज्यात तर सराईत गुन्हेगारांनी तुरुंगातून निवडणूक लढवून जिंकून दाखविली. पुरोगामी महाराष्ट्रात यापेक्षा वेगळे चित्र दिसत नाही. 1996 ची उत्तर प्रदेश विधानसभा निवडणुक 500 गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्या उमेदवारांनी लढविली. त्यापैकी 185 निवडणुकीत विजयी झाले. निवडणूक आयोगाच्या 1997 च्या आकडेवारीनुसार देशातील विविध राज्यातील 700 आमदारांना अपराधी म्हणून ओळखले जात.चौदाव्या लोकसभेत (2004) 543 पैकी 128 खासदारांची पार्श्वभूमी गुन्हेगारी स्वरुपाची होती. तर पंधराव्या लोकसभेत (2009) हि संख्या 128 वरून 150 वर गेली आहे. म्हणजेच राजकारणातील गुन्हेगारी कमी होण्याऐवजी वाढत आहे. हि खेदाची बाब आहे. सध्या देशातल्या एकून 4835 आमदार, खासदारातले 1/3 लोकप्रतिनिधी गुन्हेगारी पार्श्वभूमीचे आहेत. संसदेच्या कनिष्ठ सभागृहातील म्हणजेच लोकसभेतील 548 पैकी 75 सभासदांवर बलात्कार, खून, खुनाचा प्रयत्न अपहरण असे गंभीर आरोप आहेत. 163 खासदारावरील खटले न्यायालयात प्रलंबित आहेत. य. दि. फडके म्हणतात त्याप्रमाणे "राजकारण हा अनेकांचा पूर्णवेळचा व्यवसाय बनला आहे. निवडणूक जिंकण्यासाठी पक्षांमध्ये आणि उमेदवारांमध्ये होणारी स्पर्धा जीवघेणी बनत चालली आहे. प्राणघातक हल्ला होण्याच्या भीतीने उमेदवारांमधील बडी धेंडे स्वसंरक्षणासाठी अंगरक्षकांचा ताफा बाळगतात. त्यांनी पोसलेल्या गुंडांच्या टोळ्या मतदानाच्या दिवशी मोकाट सुटतात. बिहारमधील रणवीर सेनेने गेली काही वर्षे धुमाकूळ घातला आहे."

राजकारणाचे गुन्हेगारीकरण रोखण्या संदर्भात संसदेत चर्चा होते, राजकीय अभ्यासक याबद्दल चिंता व्यक्त करतात. मात्र गुन्हेगारांना राजकीय प्रक्रियेतून वगळण्यासाठी कायद्याचे विधेयक मांडण्याचे धाडस सत्ताधारी वा विरोधी पक्ष करताना दिसत नाहीत. म्हणूनच बिहार, उत्तर प्रदेशासारख्या राज्यात 30 टक्के पेक्षा जास्त प्रतिनिधी गुन्हेगारी पार्श्वभूमी असणारे निवडले जातात.

**भारतीय राजकारणाचे गुन्हेगारीकरण रोखण्यासाठी उपाययोजना**

1) राजकीय पक्षांनी गुन्हेगार प्रवृत्तीच्या लोकांना उमेदवारी देऊ नये.
2) जनतेने गुन्हेगार प्रवृत्तीच्या लोकांना मतदान करू नये.
3) जे राजकीय पक्ष गुन्हेगार प्रवृत्तीच्या लोकांना पक्षीय उमेदवारी देतात अशा राजकीय पक्षांवर निवडणूक आयोगाने निर्बंध लादावेत. प्रसंगी त्यांची मान्यता रद्द करावी.

4) प्रचलित लोकप्रतिनिधी कायद्यात आवश्यक तो बदल करावा. जेणे करून गुन्हेगार प्रवृत्तीच्या लोकांना निवडणुकीस उभे राहता येणार नाही.

5) निवडणूक सुधारणांसाठी नेमलेल्या सामित्यांच्या शिफारशींची अंमलबजावणी करण्यात यावी.(उदा. दिनेश गोस्वामी समिती, इंद्रजीत गुप्ता समिती व इतर समित्या)

6) पोलीस स्टेशनमध्ये गंभीर गुन्हा नोंद असलेल्या व्यक्तींची माहिती वेळोवेळी वृत्तपत्रातून प्रसिद्ध करावी, जेणे करून निवडणूक लढविणाऱ्या व्यक्तीचा, उमेदवाराचा खरा चेहरा जनतेसमोर येईल.

7) सध्या ज्या आमदार, खासदार, जिल्हा परिषद सदस्य, पंचायत समिती सदस्य किंवा अन्य राजकीय व्यक्तींवर गंभीर स्वरूपाचे गुन्हे नोंदविले आहेत अशा सदस्याचे सदस्यत्व तात्काळ निलंबित करावे. जो पर्यंत त्या सदस्याचे निर्दोषित्व सिद्ध होत नाही. तो पर्यंत त्यास सभागृहाच्या कामकाजात सहभागी करून घेऊ नये.

8) गुन्हेगारी जगतातून राजकीय पक्षांना येणाऱ्या देणग्यावर कडक उपाय योजना करावी.

थोडक्यात भारतीय राजकरणात गुन्हेगारीचे प्रमाण सतत वाढत असून त्याचे दूरगामी परिणाम संपूर्ण समाजावर होत आहेत. राजकारणीच मुळात या गुन्हेगारीला प्रोत्साहन देताना दिसून येतात. म्हणूनच हा गुन्हेगारिचा रोग नाहीसा करण्यासाठी सर्वांनी प्रयत्न करणे गरजेचे आहे,अन्यथा लोकशाही मूल्यांना, घटनेतील तत्वांना मोठ्या प्रमाणात हानी पोहचेल.

**संदर्भ–**


1) डॉ. भोळे भा. ल., भारतीय गणराज्याचे शासन आणि राजकारण, पिंपळापुरे प्रकाशन, नागपूर, 2003.

2) फडके य.दि., लोकसभा निवडणुका, 1952 ते 1999, अक्षर प्रकाशन, मुंबई. 1999.

3) दैनिक ऐक्य समूह, एरंडाचं गुऱ्हाळ, 11 जानेवारी 2011.

4) मिळून साऱ्याजणी, हिंसा व राजकारण, दिवाळी अंक 2012.

5) दैनिक ऐक्य, 12 जुलै 2013.

6) Suri K. C. (2005) Parties under Pressure Political Parties in India since Independence Lokniti Programme on Comparative Democracy, New Delhi.